Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 14, Issue 4 – Dec 2024
Impact Factor : 7.665
UGC CARE I

# चंद्रपूर जिल्हयातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या स्थितीचे चिकित्सक अध्ययन

**किशोर गुरुदास हुमने,** संशोधक
**प्रा. डॉ. प्रकाश बि. तितरे,** मार्गदर्शक, विवेकानंद महाविद्यालय, भद्रावती, जिल्हा चंद्रपूर

**गोषवारा**

भारतातील ग्रामीण आणि उपेक्षित समुदायांना, विशेषतः महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यात, शिक्षण देण्यात जिल्हा परिषद (ZP) प्राथमिक शाळा महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांचे अनन्यसाधारण महत्त्व असूनही, या शाळांना त्यांच्या कार्यक्षमता आणि शैक्षणिक निकालांवर परिणाम करणाऱ्या असंख्य आव्हानांना तोंड द्यावे लागते. प्रस्तुत संशोधनकार्यात चंद्रपूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या स्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे. संशोधनात प्राथमिक (क्षेत्र सर्वेक्षण व शिक्षकांच्या मुलाखती) आणि दुय्यम स्रोतांद्वारे (सरकारी अहवाल, शैक्षणिक सर्वेक्षण) आवश्यक ती माहिती संकलित काण्यात आली आहे. प्राप्त झालेल्या माहितीचे सांख्यकिय विश्लेषण SPSS 18.0 या सॉफ्टवेअरच्या माध्यमातुन करण्यात आले. प्राप्त झालेल्या परिणमांवरून असे निदर्शनास आले की चंद्रपूरमधील जिल्हा परिषद शाळांमध्ये सुधारणा करण्यासाठी विविध उपक्रमांची आवश्यकता आहे. संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की बहुतांश जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पक्क्या इमारतीत आहेत, परंतु बहुतांश शाळांमधे सर्व वर्गांसाठी पुरेशा वर्ग खोल्या, पुरेसे फर्निचर, व विद्यार्थ्यांसाठी पर्याप्त शौचालये नाही.

**सुचक शब्दः** जिल्हा परिषद शाळा, प्राथमिक शिक्षण, चंद्रपूर जिल्हा, ग्रामीण शिक्षण, पायाभूत सुविधा

## 1. प्रस्तावना

भारतातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सरकारी शिक्षण व्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग असताना, त्यांना अनेकदा पायाभूत सुविधांच्या आव्हानांना तोंड द्यावे लागते. यामध्ये कार्यरत शौचालये, पाण्याची सुविधा आणि पुरेशा फर्निचरसारख्या मूलभूत सुविधांची कमतरता, तसेच वीज, संगणक आणि इंटरनेट सुविधा यासारख्या संसाधनांची कमतरता यांचा समावेश आहे. विविध संस्थांचे अहवाल असे दर्शवितात की जिल्हा परिषद शाळांसह सरकारी शाळांमध्ये मोठ्या प्रमाणात आवश्यक सुविधांचा अभाव आहे, ज्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे वातावरण प्रभावित होते. अनेक जिल्हा परिषद शाळांमध्ये अपुरी किंवा शौचालये अस्तित्वात देखील नाही आहेत, पाण्याचे स्रोत आणि फर्निचरची कमतरता आहे, ज्यामुळे स्वच्छतेच्या समस्या आणि अस्वस्थ शिक्षण वातावरण निर्माण होते. या शाळांमधे मोठ्या प्रमाणात वीज, संगणक आणि इंटरनेट सुविधांचा अभाव आहे, ज्यामुळे आधुनिक शिक्षण पद्धतींच्या अंमलबजावणीत अडथळा निर्माण होतो आणि विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षण संसाधनांपर्यंत पोहोचण्यास अडथळा निर्माण होतो. खराब पायाभूत सुविधांचा थेट शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होतो, ज्यामुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती कमी होते, शिक्षकांवर ताण वाढतो आणि शिक्षणाचे परिणाम कमी होतात.

शिक्षण हे राष्ट्र आणि समाज दोघांच्याही विकास आणि समृद्धीसाठी अपरिहार्य आहे. हे आधारस्तंभ म्हणून काम करते आणि म्हणूनच भविष्यात प्रभावी रोजगारासाठी कौशल्ये आणि विकास प्रदान करते. चांगल्या शाळेच्या पायाभूत सुविधांमध्ये चांगल्या स्थितीत इमारत असणे समाविष्ट आहे ज्यात पुरेशा संख्येने सुव्यवस्थित वर्गखोल्या,



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024
Impact Factor : 7.665
UGC CARE I

पुरेसे ब्लॅकबोर्ड, टेबल, डेस्क, बेंच, खुर्च्या, पुरेशी स्वच्छता सुविधा, पुरेसे स्वच्छ पिण्याचे पाणी, वीज, वायुवीजन आणि प्रकाश, अग्निशामक आणि प्रथमोपचार किट, वैद्यकीय मदत, कॅन्टीन, पुरेसे मनोरंजन मैदान, ग्रंथालय, प्रयोगशाळा, संगणक सुविधा इत्यादींचा समावेश आहे. शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्राथमिक शाळांमध्ये शालेय पायाभूत सुविधा हा एक आवश्यक भाग आहे. सदोष शालेय पायाभूत सुविधा शाळेच्या विकासाला कारणीभूत असू शकते तर नियोजित पायाभूत सुविधा समाधानकारक विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे केंद्र आहे. या बाबींचा विचार करून प्रस्तुत संशोधनकार्यात चंद्रपूर जिल्हयातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विविध शैक्षणिक घटकांच्या संदर्भात सद्यस्थितीचे चिकित्सक अध्ययन करण्यात आले आहे.

## 2. संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनकार्यात निर्दोष माहिती मिळण्यासाठी प्रमाणिकृत संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. संशोधनाची उद्दिष्टे अभ्यासुन त्यानुसार संशोधन करण्याकरिता सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात आला. प्रस्तुत संशोधनकार्यात महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्हा परिक्षेत्राची अध्ययन परिक्षेत्र म्हणून निवड करण्यात आली व स्ंशोधन क्षेत्र म्हणून चंद्रपूर जिल्हयातील 15 तालुक्यांमधुन 6 तालुक्यांची निवड करण्यात आली व या सर्व जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचा जनसंख्या म्हणुन विचार करण्यात आला. प्रस्तुत संशोधनकार्यात संशोधकानी वर्णनात्मक संशोधन आराखडा निवडला व संभाव्यता पद्धतीतील साधा यादृच्छिक नमुना निवडण्यात आला आहे. प्रस्तुत अध्ययनात चंद्रपूर जिल्हयातील 6 तालुक्यांमधुन प्रत्येकी 50 प्रमाणे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत एकूण 300 शिक्षकांची नमुना म्हणुन निवड करण्यात आली.

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक माहिती संकलित करण्याकरिता प्रमाणीकृत पद्धतीचा व प्रश्नावलीचा उपयोग करण्यात आला. अध्ययनाच्या उद्दिष्टांना अनुसरून प्रश्नावली तयार करण्यात आली व तथ्य संकलनासाठी संशोधनक्षेत्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत शिक्षकांकडून सर्वेक्षण माध्यमाने माहिती प्राप्त केल्या गेली. प्राप्त झालेल्या माहितीचे संकलन करुन सांख्यकिय विश्लेषण करण्यात आले. प्राप्त माहितीवरुन वारंवारीता व बहुलक काढण्यात आले. त्याचप्रमाणे माहितीच्या विश्लेषणाकरीता काई वर्ग मूल्य चाचणीचा वापर करण्यात आला व संभाव्यता पातळी 0.05 निर्धारीत करण्यात आली.

## 3. सांख्यिकीय विश्लेषण व संशोधनाचे परिणाम

### 3.1 जिल्हा परिषद प्राथमिक शांळेतील शिक्षकांचा कार्य अनुभव

**सारणी क्र. 1:** जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत शिक्षकांचा कार्य अनुभव

| कार्य अनुभव | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| 5 वर्षापेक्षा कमी | 16 | 5.3 |
| 5 ते 10 वर्ष | 15 | 5.0 |
| 10 ते 15 वर्ष | 47 | 15.7 |
| 15 ते 20 वर्ष | 179 | 59.7 |
| 20 वर्षापेक्षा अधिक | 43 | 14.3 |
| एकूण | 300 | 100.0 |

काई-वर्गमूल्यः 309.667; स्वातंत्र्यांशः4; तालिका मूल्यः9.49; pमूल्यः <0.05



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

वरील सारणी क्र. 1 मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत शिक्षकांचा कार्य अनुभव याबाबत माहिती प्रस्तुत करण्यात आली आहे. अध्ययन क्षेत्रातील 5.3 टक्के शिक्षकांना 5 वर्षापेक्षा कमी अनुभव असून 5.0 टक्के शिक्षकांना 5 जे 10 वर्षाचा अनुभव असल्याचे आढळले. तसेच 15.7 टक्के व 59.7 टक्के शिक्षकांना 10 ते 15 व 15 ते 20 वर्षाचा अनुभव असून 14.3 टक्के शिक्षकांना 20 वर्षांपेक्षा अधिक अनुभव असल्याचे आढळले.

**3.2 जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या संपूर्ण परिसराला भिंत असण्याबाबत माहिती**

**सारणी क्र. 2:** जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या संपूर्ण परिसराला भिंत असण्याबाबत माहिती

| प्रतिक्रिया | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | 189 | 63.0 |
| नाही | 111 | 37.0 |
| एकूण | 300 | 100.0 |

काई-वर्गमूल्यः 20.28; स्वातंत्र्यांशः1; तालिका मूल्यः3.84; pमूल्यः <0.05

वरील सारणी क्र. 2 मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या संपूर्ण परिसराला भिंत असण्याबाबत माहिती प्रस्तुत करण्यात आली आहे. अध्ययन क्षेत्रातील 63.0 टक्के शाळेच्या संपूर्ण परिसराला भिंत असून 37.0 टक्के शाळेच्या परिसराला भिंत नसल्याचे आढळले.

**3.3 जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पक्क्या इमारतीत असण्याबाबत माहिती**

**सारणी क्र. 3:** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पक्क्या इमारतीत असण्याबाबत माहिती

| प्रतिक्रिया | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | 216 | 72.0 |
| नाही | 84 | 28.0 |
| एकूण | 300 | 100.0 |

काई-वर्गमूल्यः 58.08; स्वातंत्र्यांशः1; तालिका मूल्यः3.84; pमूल्यः <0.05

वरील सारणी क्र. 3 मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पक्क्या इमारतीत असण्याबाबत माहिती प्रस्तुत करण्यात आली आहे. अध्ययन क्षेत्रातील 72.0 टक्के शाळा पक्क्या इमारतीत असून 28.0 टक्के शाळा पक्क्या इमारतीत नसल्याचे आढळले.

**3.4 जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सर्व वर्गांसाठी पुरेशा वर्गखोल्या असण्याबाबत**

**सारणी क्र. 4:** जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सर्व वर्गांसाठी पुरेशा वर्गखोल्या असण्याबाबत माहिती

| प्रतिक्रिया | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | 127 | 42.3 |
| नाही | 173 | 57.7 |
| एकूण | 300 | 100.0 |

काई-वर्गमूल्यः 7.053; स्वातंत्र्यांशः1; तालिका मूल्यः3.84; pमूल्यः <0.05

वरील सारणी क्र. 4 मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सर्व वर्गांसाठी पुरेशा वर्गखोल्या असण्याबाबत



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

माहिती प्रस्तुत करण्यात आली आहे. अध्ययन क्षेत्रातील 42.3 टक्के शाळेत सर्व वर्गांसाठी पुरेशा वर्गखोल्या असून 57.7 टक्के शाळेत सर्व वर्गांसाठी पुरेशा वर्गखोल्या नसल्याचे आढळले.

**3.5 जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पुरेसे फर्निचर असण्याबाबत माहिती**

**सारणी क्र. 5:** जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सर्व विद्यार्थ्यांसाठी पुरेसे फर्निचर असण्याबाबत माहिती

| प्रतिक्रिया | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | 134 | 44.7 |
| नाही | 166 | 55.3 |
| एकूण | 300 | 100.0 |

काई-वर्गमूल्यः 3.413; स्वातंत्र्यांश:1; तालिका मूल्य:3.84; pमूल्यः <0.05

वरील सारणी क्र. 5 मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सर्व विद्यार्थ्यांसाठी पुरेसे फर्निचर असण्याबाबत माहिती प्रस्तुत करण्यात आली आहे. अध्ययन क्षेत्रातील 44.7 टक्के शाळेत सर्व विद्यार्थ्यांसाठी पुरेसे फर्निचर असून 55.3 टक्के शाळेत सर्व विद्यार्थ्यांसाठी पुरेसे फर्निचर नसल्याचे आढळले.

**3.6 जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पिण्याच्या पाण्याची सुविधा**

**सारणी क्र. 6:** जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पिण्याच्या पाण्याची सुविधा असण्याबाबत माहिती

| प्रतिक्रिया | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | 264 | 88.0 |
| नाही | 36 | 12.0 |
| एकूण | 300 | 100.0 |

काई-वर्गमूल्यः 173.28; स्वातंत्र्यांश:1; तालिका मूल्य:3.84; pमूल्यः <0.05

वरील सारणी क्र. 6 मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पिण्याच्या पाण्याची सुविधा असण्याबाबत माहिती प्रस्तुत करण्यात आली आहे. अध्ययन क्षेत्रातील 88.0 टक्के शाळेत पिण्याच्या पाण्याची सुविधा असून 12.0 टक्के शाळेत पिण्याच्या पाण्याची सुविधा नसल्याचे आढळले.

**3.7 जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वॉटर कूलर असण्याबाबत माहिती**

**सारणी क्र. 7:** जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वॉटर कूलर असण्याबाबत माहिती

| प्रतिक्रिया | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | 208 | 69.3 |
| नाही | 92 | 30.7 |
| एकूण | 300 | 100.0 |

काई-वर्गमूल्यः 44.853; स्वातंत्र्यांश:1; तालिका मूल्य:3.84; pमूल्यः <0.05

वरील सारणी क्र. 7 मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वॉटर कूलर असण्याबाबत माहिती प्रस्तुत करण्यात आली आहे. अध्ययन क्षेत्रातील 69.3 टक्के शाळेत वॉटर कूलर असून 30.7 टक्के शाळेत वॉटर कूलर नसल्याचे आढळले.



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

**3.8 जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पाणी शुद्धीकरण व्यवस्थेबाबत माहिती**

**सारणी क्र. 8:** जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पाणी शुद्धीकरण व्यवस्था असण्याबाबत माहिती

| प्रतिक्रिया | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | 231 | 77.0 |
| नाही | 69 | 23.0 |
| एकूण | 300 | 100.0 |

काई-वर्गमूल्यः 87.48; स्वातंत्र्यांशः1; तालिका मूल्यः3.84; pमूल्यः <0.05

वरील सारणी क्र. 8 मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पाणी शुद्धीकरण व्यवस्था असण्याबाबत माहिती प्रस्तुत करण्यात आली आहे. अध्ययन क्षेत्रातील 77.0 टक्के शाळेत पाणी शुद्धीकरण व्यवस्था असून 23.0 टक्के शाळेत पाणी शुद्धीकरण व्यवस्था नसल्याचे आढळले.

**3.9 जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शौचालयांची पर्याप्तता**

**सारणी क्र. 9:** जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पर्याप्त शौचालये असण्याबाबत माहिती

| प्रतिक्रिया | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | 113 | 37.7 |
| नाही | 187 | 62.3 |
| एकूण | 300 | 100.0 |

काई-वर्गमूल्यः 18.253; स्वातंत्र्यांशः1; तालिका मूल्यः3.84; pमूल्यः <0.05

वरील सारणी क्र. 9 मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पर्याप्त शौचालये असण्याबाबत माहिती प्रस्तुत करण्यात आली आहे. अध्ययन क्षेत्रातील 37.7 टक्के शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पर्याप्त शौचालये असून 62.3 टक्के शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पर्याप्त शौचालये नसल्याचे आढळले.

**4. निष्कर्ष**

**4.1 जिल्हा परिषद प्राथमिक शांळेतील शिक्षकांचा कार्य अनुभव**

- संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत बहुतांश शिक्षकांना 15 ते 20 वर्षाचा अध्यापनाचा कार्यानुभव आहे.

**4.2 जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या संपूर्ण परिसराला भिंत असण्याबाबत माहिती**

- संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की बहुतांश जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या संपूर्ण परिसराला भिंत आहे.

**4.3 जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पक्क्या इमारतीत असण्याबाबत माहिती**

- संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की बहुतांश जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पक्क्या इमारतीत आहे.

**4.4 जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वर्गांसाठी पुरेशा वर्गखोल्या असण्याबाबत**

- संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की बहुतांश जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सर्व वर्गांसाठी पुरेशा वर्ग खोल्या नाही.



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

**4.5 जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पुरेसे फर्निचर असण्याबाबत माहिती**

- संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सर्व विद्यार्थ्यांसाठी पुरेसे फर्निचर नाही.

**4.6 जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पिण्याच्या पाण्याची सुविधा**

- संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की बहुतांश जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पिण्याच्या पाण्याची सुविधा आहे.

**4.7 जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वॉटर कूलर असण्याबाबत माहिती**

- संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की बहुतांश जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वॉटर कूलर आहे.

**4.8 जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पाणी शुद्धीकरण व्यवस्थेबाबत माहिती**

- संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पाणी शुद्धीकरण व्यवस्था आहे.

**4.9 जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शौचालयांची पर्याप्तता**

- संशोधनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की बहुतांश जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पर्याप्त शौचालये नाही.



Copyright © | JET Network, All Rights Reserved

**5. आधार ग्रंथसूची**

1. घाटोळे रा.ना., (2010). समाज शास्त्रीय संशोधन तत्वे आणि पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्रं. 116.
2. कऱ्हाडे, सदा, संशोधन: सिद्धांत आणि पद्धती, 2 री आ., मुंबई: लोकवाङ्‌मय गृह, 2007, पृ. 134.
3. बोरूडे, रा.र, संशोधन पद्धतीशास्त्र, पुणे: पुणे विद्यार्थी गृह, 2005, पृ. 398
4. भिंताडे वि.रा. शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे, नूतन, 2004, पृ. चैदा, 224.
5. Abbi, R. (2012). Effect of Type of School Management and School Factors on Educational Performance of Primary School Children in Navi Mumbai: Multiple Classification Model, International Journal of Allied Practice, Research and Review, pp.1-13.
6. Arumugam V and Chandre A. (2024). An Analytical Study on Changes Required in Government Schools for the Upliftment of Students, International Journal of Multidisciplinary Research & Reviews, 3(2), pp. 18-27.
7. Bilgaye K. and Parvez A. (2021). Female Education and Literacy at Remote Zilla Parishad Schools surrounding the village Susri in Yavatmal District of Maharashtra, Journal of Emerging Technologies and Innovative Research, 8(8), pp.828-837.
8. Khandagale V. S.and Pandya S. (2014). Private Cost of Education and Academic Achievement of Students: An Analysis by School Types, Online Submission, 19(2), pp.39-43.
9. Motkuri V and Revathi E. (2024). Private and Public Expenditure on Education in India: Trend over last Seven Decades and impact on Economy, Indian Public Policy Review, 5(1), pp. 90-112.
10. Mukherjee A. and Sengupta S. (2023). An analysis of factors affecting private expenditure on education in India, Arthaniti: Journal of Economic Theory and Practice, 22(2), pp.206-227.



Copyright © | JET Network, All Rights Reserved